# वाङ्मयविलास

## डॉ. विलास तायडे गौरवग्रंथ




।। संपादक ।।

डॉ. अशोक इंगळे
डॉ. भास्कर पाटील
डॉ. कैलास वानखडे
डॉ. अशोक वाहुरवाघ
डॉ. गणेश इंगळे

# वाङ्मयविलास

## डॉ. विलास तायडे गौरवग्रंथ

:: संपादक ::

डॉ. अशोक इंगळे, डॉ. भास्कर पाटील
डॉ. कैलास वानखडे, डॉ. अशोक वाहुरवाघ
डॉ. गणेश इंगळे




ज्ञानपथ पब्लिकेशन

# वाङ्मयविलास

## डॉ. विलास तायडे गौरवग्रंथ

संपादक मंडळ :
**डॉ. अशोक इंगळे, डॉ. भास्कर पाटील,**
**डॉ. कैलास वानखडे, डॉ. अशोक वाहुरवाघ, डॉ. गणेश इंगळे**

मुखपृष्ठ : | मांडणी/रेखाटने :
**बळी खैरे** | **श्रीधर अंभोरे**



**Copyright © सौ. सुरेखा विलास तायडे**

**आवृत्ती : प्रथम, २३ फेब्रुवारी २०२५**

**ISBN 13 : 978-93-6409-304-0**

ISO 9001 : 2015
ज्ञानपथ पब्लिकेशन®

A Leading **National Books Publishing** House In India

**मुख्य कार्यालय** : **एफएफएस–ए, ब्लॉक सी, पहिला माळा, व्हिनस प्लाझा, शेगाव नाका, वि.म.वि. रोड, अमरावती – ४४४ ६०३**

**शाखा कार्यालय** : **फ्लॅट नं. १०५–१०६, पी.आर. प्लाझा, मेन रोड, खामला, नागपूर – ४४००२५**

**ई–मेल** : dnyanpathpub@gmail.com

**वेबसाईट** : www.dnyanpath.com

**संपर्क** : ०८६००३५३७१२, ०९५०३२३७८०६

Visit us
www.dnyanpath.com

**मुद्रक –**
**श्री गुरुदेव प्रिंटर्स, अमरावती**
**महात्मा फुले संकुल, अभियंता भवनसमोर, शेगाव नाका, अमरावती – ४४४६०३**

---

लेखकाच्या परवानगीशिवाय या पुस्तकातील कोणताही भाग, पुस्तकाचे नाव, शीर्षक, डिझाईन, छायाचित्रे, मांडणी, पत्रे, नकाशे व आतील कोणताही मजकूर पूर्णत: किंवा आंशिक रूपाने भारताच्या कोणत्याही भाषेत फेरबदल किंवा विकृत करून छापण्याचा प्रयत्न करू नये अथवा कोणत्याही नमुन्यात पुनर्मुद्रित करू नये. या प्रकाशनासंदर्भात अनधिकृत कृत्य केल्यास संबंधितावर भारतीय कॉपीराईट ॲक्टनुसार कारवाई केली जाईल.

₹ : ६००/-

# अनुक्रमणिका

## ग्रामीण साहित्य


१. मराठी साठोत्तर ग्रामीण चळवळीचे योगदान १९६० ते १९९० — १
डॉ. वासुदेव मुलाटे
२. ग्रामीण साहित्य आणि स्त्रीवाद — १५
डॉ. माधव पुटवाड
३. वऱ्हाडी भाषा आजच्या प्रमाण मराठी भाषेची जननी — ३७
सुरेश साबळे

## मराठी वैचारिक साहित्य

४. मराठी कादंबरी आणि जागतिकीकरण — ५१
डॉ. मोना चिमोटे
५. आधुनिक मराठी वैचारिक निबंधातील प्रबोधनाचे स्वरूप — ६५
डॉ. भास्कर पाटील

## लोक साहित्य

६. मिथक, लोककथा व दंतकथा — ८७
डॉ. अशोक राणा
७. लोकसाहित्यातील कालसंगत संदर्भ : शोध आणि बोध — १०३
डॉ. शंकर राऊत
८. शिवी : एक शाब्द लोकाविष्कार — १११
डॉ. काशीनाथ बऱ्हाटे



९. लोकसाहित्याचे बदलते स्वरूप व व्याप्ती १३२
डॉ. श्रीकृष्ण काकडे

## आंबेडकरवादी साहित्य

१०. बौद्ध स्त्रियांची ओवी गीते १४१
प्रा. दामोदर मोरे
११. आंबेडकरवादी कादंबरी : यथार्थ – मथितार्थ १५०
डॉ. युवराज सोनटक्के
१२. नव्वदोत्तर दलित–आंबेडकरवादी कविता १६०
डॉ. अशोक पळवेकर
१३. दलित साहित्य की आंबेडकरी साहित्य : एक मुक्त चर्चा १८५
रवींद्र इंगळे चावरेकर
१४. आंबेडकरवादाचे मुखपत्र अस्मितादर्श २०५
डॉ. चिंतामण कांबळे
१५. आंबेडकरी समीक्षा व प्रचलित समीक्षाप्रवाह २२८
डॉ. शत्रुघ्न जाधव
१६. समकालीन आंबेडकरी कविता व बौद्ध साहित्यातील संदर्भांचा अन्वयार्थ २४८
डॉ. अशोक रा. इंगळे



## डॉ. विलास तायडे : वाङ्मयीन कार्य


१७. **डॉ. विलास तायडे यांच्या साहित्यातील शोषण सत्तेची आयुधे** २६३
प्राचार्य डॉ. सुभाष खंडारे

१८. **नामदेव ढसाळांची कविता : स्वरूप आणि आकलन** २६९
प्रा. शुक्राचार्य गायकवाड

१९. **डॉ. विलास तायडे यांचे समीक्षा ग्रंथ : एक दृष्टिक्षेप** २७४
प्रदीप जाधव

२०. **मेळघाटातील कोरकू लोकसंस्कृती : काही संदर्भ** २८६
आ. कि. सोनोने

२१. **डॉ. विलास तायडे यांच्या ग्रंथांचा संक्षिप्त परिचय** २९२
प्रा. ग. रा. अंबाडकर

२२. **नामदेव ढसाळांची कविता: स्वरूप आणि आकलन: एक मौलिक ग्रंथ** २९७
डॉ. पंजाब पुंडकर

२३. **डॉ. विलास तायडे यांच्या समीक्षा ग्रंथांचे परिशीलन** ३०२
डॉ. अनिल काळबांडे

२४. **डॉ. विलास तायडे : व्यक्तित्व आणि वाङ्मयीन कर्तृत्व** ३०५
डॉ. अशोक वाहुरवाघ

२५. **मेळघाटातील कोरकूंची लोकसंस्कृती : एक अभ्यास** ३१६
डॉ. रविकांत महिंदकर


## डॉ. विलास तायडे : कार्यकर्तृत्व


२६. **डॉ. विलास तायडे आणि सामाजिकता** ३२१
प्रा. मुकुंद भारसाकळे

२७. **डॉ. विलास तायडे : बहुआयामी व्यक्तिमत्त्व** ३२६
डॉ. एम. आर. इंगळे


२८. **एक दिलदार मित्र: डॉ. विलास तायडे** ३३१
प्रा. दीपककुमार खोब्रागडे




# ॥ डॉ. विलास तायडे ॥
## व्यक्तित्व आणि वाङ्मयीन कर्तृत्व

**डॉ. अशोक वाहुरवाघ**

तथागत भगवान बुद्धांनी आपल्या धम्म निरूपणात चार प्रकारची माणसे समाजात असल्याचे सांगितले आहे. पहिल्या प्रकारात जो मनुष्य स्वतःच्या अथवा इतरांच्या कल्याणासाठी झटत नाही. दुसऱ्या प्रकारचा मनुष्य हा स्वतःचे हीत सोडून दुसऱ्याच्या हितासाठी झटतो. तर तिसऱ्या प्रकारचा मनुष्य हा स्वतःच्या हितासाठी झटतो पण दुसऱ्याच्या हितासाठी झटत नाही; मात्र चौथ्या प्रकारचा मनुष्य हा स्वतःचे त्याचप्रमाणे दुसऱ्याचे हीत साधण्यासाठी झटत असतो. तोच सर्वोत्तम पुरुष समजला पाहिजे. अशी माणसे न्यायी आणि सज्जनही असतात असे बुद्ध म्हणतात. तथागत बुद्धांचे हे तत्त्व लक्षात घेतले तर सेवानिवृत्तीच्या निमित्ताने ज्यांच्या नावाने हा गौरवग्रंथ प्रकाशित होत आहे; ते डॉ. विलास विश्वनाथ तायडे हे बुद्धांच्या तत्त्व कसोटीवर पूर्णपणे खरे उतरताना दिसतात.



डॉ. विलास तायडे हे आपल्या ज्ञान कौशल्याने स्वतःचा आणि सामाजिक बांधिलकीतून समाजाच्या हिताचा सदैव विचार करतात. त्याचबरोबर त्यांचे शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक तथा आंबेडकरी चळवळीतील योगदानही लक्षणीय आहे. हे लक्षात घेऊन त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचा, वाङ्मय संपदेचा, साहित्य समीक्षकाचा त्याचबरोबर त्यांच्या संघर्षमय जीवन कार्याचा चिकित्सकपणे अभ्यास करून एक उत्कृष्ट व्यक्तिमत्त्वाचे प्राध्यापक, साक्षेपी समीक्षक, उत्कृष्ट मार्गदर्शक आणि आंबेडकरी चळवळीतील कुशल कार्यकर्ता म्हणून सर्वांना त्यांचा परिचय व्हावा यासाठी हा लेख शब्दबद्ध केला आहे.

विदर्भाची माती ही नवरत्नांची खाण आहे. या मातीतून अनेक नवरत्ने जन्माला आली आहेत. त्यात संत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा, भाऊसाहेब पंजाबराव देशमुख, विनोबा भावे, या सारख्या थोर महापुरूषांचा सामवेश होतो. याच मातीत दिनांक १० जानेवारी १९६५ रोजी अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यात मनब्दा या लहानशा खेडेगावात स्वाभिमानी पिता विश्वनाथ तायडे आणि त्यागी व कुटुंबवत्सल माता लक्ष्मीबाई यांच्या पोटी चंद्रमोळ्या झोपडीत डॉ. विलास तायडे यांचा जन्म झाला. जन्मताच घरी अठराविश्व दारिद्र्य. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १९५६ ला झालेली धम्मक्रांती आणि मिळालेल्या शिक्षणाचा मूलमंत्र वडिलांनी मनात ठेऊन; या बिकट परिस्थितीवर मात केली आणि कुटुंबातील सर्व मुलामुलींना शिक्षण देण्याचे ठरविले. त्यामुळेच डॉ. विलास तायडे यांना शिकता आले.

डॉ. विलास तायडे हे माता-पित्याचे चवथे अपत्य होते. पिता आणि वडील बंधू श्रीधरराव यांच्या संस्कारात वाढत असताना आपल्या मुलाने खूप शिकावे म्हणून डॉ. विलास तायडे यांना गावातील जिल्हा परिषदच्या सरकारी शाळेत पहिल्या वर्गात दाखल करण्यात आले. पहिली ते सातवी पर्यंत शिकत असताना त्यांनी अभ्यासातून आपल्या बुद्धिमत्तेची वेळोवेळी [illegible] दाखवून चवथा व सातवा वर्ग उत्तम रीतीने पास करून गुरुजींची [illegible] मिळवली. याच प्राथमिक शिक्षणातून त्यांच्यात पुस्तक वाचनाची [illegible] झाली. वडील आणि दादा श्रीधरराव यांच्या प्रोत्साहनामुळे [illegible] तालुक्याच्या ठिकाणी आकोटला नरसिंग विद्यालयात प्रवेश व [illegible] वसतिगृहात

राहण्यासाठी नाव टाकण्यात आले. १९८१ला त्यांनी बऱ्यापैकी गुणांसह दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली. पुढे त्यांनी १९८२-८३ला १२ वीची परिक्षा निंबा येथून उत्तीर्ण केली. त्यानंतर १९८४ला श्री शिवाजी महाविद्यालय आकोट येथे बी.ए.ला प्रवेश घेतला आणि तेथीलच किसान विद्यार्थी वसतिगृहात राहून पदवीची परीक्षासुद्धा द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण केली. अशा यशामुळे डॉ. विलास यांचे शिक्षणात चांगलेच मन रमले होते. सोबतच वडील आणि मोठे बंधू श्रीधरराव तायडे हे प्रोत्साहन व मदत करीत होते. मुलगा फार हुशार आहे म्हणून पुढे अकोल्याच्या सीताबाई कला महाविद्यालयात एम.ए. मराठीला प्रवेश घेण्यात आला. त्यावेळेला कठीण समजली जाणारी ही परीक्षासुद्धा त्यांनी महाविद्यालयात सर्वात जास्त गुण मिळून व विद्यापीठातील पाचवा मेरीट येऊन ५७% गुणांसह उत्तीर्ण केली.

डॉ. विलास तायडे ज्या कालखंडात (१९७०-९०) शिक्षण घेत होते त्यावेळेला शिक्षण घेणे तेवढे सोपे नव्हते. घरची आर्थिक परिस्थिती अतिशय दयनीय असल्यामुळे शेतात निंदायला जाणे, काड्याफणं वेचणे, नांगरणीची अगोल हाकलणे, निंबोळ्या जमा करून विकणे, ब्रेड विकणे, आंबे विकणे, अशी कष्टाची लहान-मोठी कामे त्यांनी केली. त्यांच्या या कष्टाचे चीज होऊन आकोटच्या ज्या महाविद्यालयात पदवीचे शिक्षण पूर्ण केले त्याच श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट येथे महाविद्यालायात त्यांना प्राध्यापकाची नोकरी मिळाली. त्यानंतर एम.फील, नेट, पीएच.डी. व पीएच.डी.चे मार्गदर्शक या सारख्या उच्च श्रेणीच्या पदव्या त्यांनी मिळविल्या. मलेशिया, थायलंड सारख्या देशातील मानाचे पुरस्कार ही त्यांनी मिळविले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात वेगवेगळ्या समित्यांवर त्यांनी यशस्वी रित्या काम केले आहे. याच विद्यापीठात संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे ते आज मार्गदर्शक आहेत. सद्यस्थितीत त्यांच्याकडे असलेल्या ज्ञानाचा उपयोग करून घेण्यासाठी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील नोंदणीकृत पीएच.डी.चे विद्यार्थी मार्गदर्शन घेण्यासाठी येत असतात. त्यांच्या उत्कृष्ठ मार्गदर्शनाखाली चार विद्यार्थी पीएच.डी.प्राप्त झाले आहेत. त्यापैकी एक मी सुद्धा आहे. खरे म्हणजे त्यांच्या मार्गदर्शनात मला पीएच.डी. प्राप्त करता आली याचा मला सार्थ अभिमान आहे.

व्यक्तिमत्त्व म्हणजे एखाद्या व्यक्तीची वर्तणूक, विचार, भावना, स्वभाव, दृष्टिकोन चारित्र्य, बुद्धिमत्ता, कौशल्य, संवेदनशीलता, गुण-अवगुण व सामाजिक योगदान यांच्या एकत्रित परिपाकातून व्यक्तिमत्त्व घडत असते. डॉ. विलास तायडे हे सामाजिकभान जपणारे संवेदनशील मनाचे व्यक्ती आहेत. सोबतच तथागत भगवान गौतम बुद्ध, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जोतीराव फुले, शाहू महाराज, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज, यांच्या पुरोगामी विचारातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली आहे. सोबतच ज्या वर्गातून आणि सामाजिक स्तरातून आपण आलो आहोत याची जाणीव त्यांना आहे. आपल्या अवती-भवतीचा समाज हा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या अत्यंत मागास आहे. हे त्यांना पक्के ठाऊक आहे. म्हणूनच अशा मागास समाजाच्या हितासाठी, कल्याणासाठी झटणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे याची सदैव जाणीव ते ठेवतात आणि कृतीप्रवण राहतात. महापुरुषांच्या विचारानुसार शिक्षणातून व प्रबोधनातून समाजाची प्रगती होऊ शकते हे त्यांनी जाणले आहे. 'जे जे आपणाशी ठावे, ते इतराशी सांगावे, शहाणे करून सोडावे, सकळ जन'. या जाणिवेतूनच त्यांनी १९९८ साली 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार मंच आकोट' या संघटनेची स्वतः स्थापना केली. सदरच्या विचार मंचच्या माध्यमातून त्यांनी सतत दहा वर्ष संस्थापक अध्यक्ष म्हणून शाहू, फुले, आंबेडकर आणि पंजाबराव देशमुख या महापुरुषांच्या विचारधारेवर आधारित व्याख्यानमाला, सामुहिक विवाह सोहळे, विद्यार्थ्यांकरिता मोफत शिकवणी वर्ग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील नाटिका आयोजित करून समाजाचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला.

डॉ. विलास तायडे यांना आपल्या अवती-भोवतीच्या समाजातील लोकांच्या आर्थिक सामजिक व शैक्षणिक समस्यांची आणि परिस्थितीची खोलवर जाण आहे. अशा समाजासाठी सामाजिक दायित्वाच्या भावनेतून त्यांच्या उत्थानाविषयीची तळमळ सदैव त्यांच्या मनात असते. सोबतच संत गाडगे बाबांच्या दशसूत्रीच्या विचार प्रभावातून त्यांची जडणघडण सुद्धा झाली आहे. म्हणूनच त्यांनी संत गाडगेबाबांच्या दशसूत्रीचा एक भाग म्हणून

समाजातील जे गरीब कुटुंब आपल्या मुला-मुलींच्या लग्नाचा खर्च करू शकत नाहीत. अशा गरजू लोकांसाठी सामूहिक विवाह पद्धतीचे मेळावे घेऊन त्यांनी गरीब मुला-मुलींची लग्न लावून दिली आहेत. अशा या नाविण्यपूर्ण उपक्रमाची आणि सामजिक व शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेऊन २०१३ साली आकोट भूषण पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. विलास तायडे हे स्वभावाने शांत आहेत. आपल्या मधुर व रसाळ लययुक्त वाणीने ते सर्वांना मोहित करतात. त्यांची देहबोली व चेहऱ्यावरील हास्य यामुळे ते सदैव टवटवीत असतात. त्यांची बोलीभाषा मनाला जाऊन भिडणारी आहे. ती समोरील व्यक्तीच्या मनात जवळीकता आणि आपुलकी निर्माण करते. त्याचप्रमाणे भेटणारी व्यक्ती परिचित असो वा नसो सर्वांना ते आपले मानतात. त्यामुळे त्यांच्या सहवासात वा संपर्कात येणारी प्रत्येक व्यक्ती ही त्यांना कधी विसरत नाही; तर त्यांना कायम स्मरणात ठेवते.

डॉ. विलास तायडे यांचे विशेष हे की, त्यांचे विद्यार्थ्यासोबतचे नाते विशेष जिव्हाळ्याचे नि आपुलकीचे राहिलेले आहे. जो कोणी विद्यार्थी गरजू आहे किंवा संकटात आहे त्याच्या मदतीला ते आवर्जून धावून जातात. त्यामुळे महविद्यालयात विद्यार्थांचे लाडके प्राध्यापक म्हणून ते मान्यता पावले आहेत. याची साक्ष आज अनेक विद्यार्थी देतात.

डॉ. विलास तायडे यांच्यातील एक गुण खास वाखानण्याजोगा व नमूद करण्यासारखा आहे. तो गुण म्हणजे दिलेला शब्द, वेळ आणि वचन पाळणे होय. खरे म्हणजे तो त्यांचा बाणाच आहे. त्याचप्रमाणे मैत्री भाव जपणे हा त्यांचा दुसरा गुणही खास आहे. त्यामुळे महाविद्यालयातील असंख्य विद्यार्थी, त्यांच्या मराठी विभागात अध्यापन करणारे मराठी विषयाचे सहकारी प्राध्यापक, महाविद्यालयीन कर्मचारी, प्राचार्य, संस्थेचे अध्यक्ष यांच्यासोबत त्यांचेसबंध मित्र आणि बंधू भावाचे आहेत. एवढेच नव्हे तर मराठी साहित्य विश्वातील नामवंत लेखक गंगाधर पानतावणे, नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, नारायण सुर्वे, श्रीपाल सबनीस, दामोदर मोरे, युवराज सोनटक्के या सारख्या प्रख्यात व मातब्बर कवी, समीक्षक, कथाकार, कादंबरीकार असलेल्या साहित्यकासोबतचे त्यांचे नाते सलोख्याचे व सौजन्याचे राहिलेले आहे.

डॉ. विलास तायडे यांचे वाङ्मयीन कर्तृत्व मोठे आहे. मराठी साहित्य विश्वात आज रोजी त्यांच्या नावे चार मराठी समीक्षाग्रंथांची नोंद आहे व तीन संपादित ग्रंथ आहेत. त्यामध्ये 'नामदेव ढसाळांची कविताः स्वरूप आणि आकलन' (२०१५) 'बाबुराव बागूलांची दीर्घकथा 'सूड' एक आकलन' (२०१७) 'नारायण सुर्वेची कविताः स्वरूप आणि समीक्षा' (२०१८) मेळघाटातील कोरकूंची लोकसंस्कृती (२०१९) हे त्यांचे चार दर्जेदार समीक्षाग्रंथ प्रकाशित झाले आहेत. त्यापैकी 'नामदेव ढसाळांची कविताः स्वरूप आणि आकलन' हा त्यांचा प्रबंधाचा विषय असलेला समीक्षाग्रंथ होय. मराठी काव्यसृष्टीत ज्या कवीने मध्यमवर्गीय संवेदनेला धक्के दिले. एवढेच नाही तर मराठी समीक्षेला दलित कवितेची, साहित्याची दखल घेण्यास भाग पाडले. ते उत्तुंग प्रतिभेचे विद्रोही तथा मानवतावादी कवी म्हणजे नामदेव ढसाळ होत. ढसाळांच्या कवितेचे आकलन होणे आणि तिची समीक्षा करणे हे मराठी साहित्यातील समीक्षेला प्रथमपासून जड आणि आव्हानात्मक राहिलेले आहे. डॉ. विलास तायडे यांनी ते धाडस प्रथम केले आणि त्यात यशस्वी झाले. सदर ग्रंथाच्या पृष्ठ क्रमांक ५ वरील मनोगतात ते म्हणतात की, ''सर्वस्पर्शित्वाचे विद्रोही रूप कवितेला पहिल्यांदा कुणी दिले असेल तर ते नामदेव ढसाळांनी! नामदेव ढसाळाचे मूल्यमापन पारंपारिक पद्धतीने करणे चुकीची आहे.'' ही जाणीव ठेवून त्यांनी सदरच्या ग्रंथामध्ये समीक्षा केली आहे. 'गोलपिठा' हा ढसाळांचा पहिला कवितासंग्रह. 'गोलपिठा'ची समीक्षा करताना ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात 'नामदेव ढसाळांच्या कवितेचे स्वरूप' या पहिल्या प्रकरणात 'गोलपिठा'चे अंतरंग उलगडून दाखविण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केला आहे. त्यादृष्टीने पुढील काव्य ओळी अत्यंत लक्षवेधी ठरतात.

'माणसाने पहिल्या प्रथम स्वतःला
पूर्ण अंशाने उद्ध्वस्त करून घ्यावे
नंतर उरल्या सुरल्यांनी कुणालाही गुलाम करू नये, लुटू नये
काळा गोरा म्हणू नये
आभाळाला आजोबा अन् जमिनीला आजी
माणून त्यांच्या कुशीत आनंदाने राहावे

चंद्रसूर्य फिके पडतील असे सचेत कार्य करावे
एक तीळ सर्वांनी कांडून खावा
माणसाचेच गाणे गावे माणसाने'

उपरोक्त कवितेत आलेला विद्रोह आणि संताप हा मानवाच्या हितासाठी, कल्याणासाठी आलेला आहे. हे डॉ. तायडे आपल्या समीक्षाग्रंथात वाचकाच्या लक्षात आणून देतात. त्यामुळे वाचकाला या समीक्षाग्रंथातून नवी दृष्टी प्राप्त होते. हेच या समीक्षेचे वेगळेपण ठरते.

'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले', 'तुही इयत्ता कंची तुही इयत्ता', 'गांडू बगीचा', 'या सत्तेत जीव रमत नाही'या कविता संग्रहाचे त्यांनी रुपवादी समीक्षा, आस्वादक समीक्षा, आत्मचरित्रात्मक चिकित्सा केली आहे. तर दुसऱ्या प्रकरणात नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील शब्द शैली, प्रतिमा सृष्टी, सामाजिक विद्रोह, धार्मिक विद्रोह, सांस्कृतिक विद्रोह, भाषिक विद्रोह या अंगाने सुरेख मांडणी केली आहे, पुढील प्रकरणात नामदेव ढसाळांच्या समग्र कवितांमध्ये बुद्ध, चार्वाक, कार्ल मार्क्स, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार तत्त्वावर ढसाळांची कविता कशी उभी आहे; याचे सखोल विवेचन ते करतात. त्यादृष्टीने पृष्ठ क्रमांक २३८वरील 'आत्ता' या कवितेतील काव्यओळी उल्लेखनीय वाटतात.

'सूर्यफुले हाती ठेवणारा फकीर हजारो वर्षानंतर लाभला
आता सूर्यफुलासारखे सुर्योन्मुख झालेच पाहिजे'.

वरील काव्यपंक्तीतील 'सुर्योन्मुख' या शब्दाचा अर्थ 'आंबेडकरोन्मुख' असा नवा अर्थ या समीक्षा ग्रंथात लावतात. त्यांची अशी ही सर्जनशील समीक्षा मराठी समीक्षेला नव्याने विचार करयला लावणारी तथा नवी दिशा देणारी आहे. असे या ग्रंथाचे मोल आणि योगदान आहे.

'नारायण सुर्वेची कविताः स्वरूप आणि समीक्षा' डॉ. विलास तायडे यांचा प्रकाशित झालेला हा दुसरा समीक्षाग्रंथ होय. १९६० नंतरच्या पहिल्या पिढीत समाजातील उपेक्षित वर्गाचे कवी म्हणून नारायण सुर्वे सर्वांना परिचित आहेत. त्यांच्या कवितेत दलित, पीडित, शोषित व उपेक्षित असलेल्या लोकांचे दुःख, दैन्य, दारिद्र्य, उपासमार अर्थातच 'भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली' अशा समस्यांनी ग्रस्त असलेल्या लोकांचे जीवन आहे. या लोकांच्या

उत्थानाचा मार्ग म्हणून कवी सुर्वे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स यांना प्रमाण मानतात. डॉ. तायडे यांचा विचार पिंडही त्याच धाटीचा आहे. त्यामुळेच तर त्यांनी नारायण सुर्वेंच्या कवितेवर समीक्षा करण्याचे योजिले असावे. त्या संदर्भात आपल्या मनोगतात डॉ. तायडे लिहितात की, दलित, पीडित उपेक्षित, कामगार वर्गाचे सत्य वास्तव सुर्वेनी आपल्या कवितेमध्ये जिवंत शिल्पासारखे करून ठेवले आहे. त्यामुळे सुर्वे हे सामाजिक जाणीवेच्या दृष्टीने फार महत्त्वाचे कवी ठरतात. त्यांचे हे विधान अत्यंत मौलिक आहे. ज्याप्रमाणे एखादा शिल्प कारागीर आपल्या कौशल्याने शिल्प उभे करतो त्याचप्रमाणे नारायण सुर्वेंनी आपल्या कवितेमध्ये उपेक्षित समाजाचे चित्र रेखाटून त्याला अमरत्व प्राप्त करून दिले हे अगदी सत्य आहे.

'नारायण सुर्वेची कविता: स्वरूप आणि समीक्षा' हा ग्रंथ एकशे शेचाळीस पृष्ठांचा असून तो पाच प्रकरणांमध्ये विभागला आहे. नारायण सुर्वे आणि मार्क्सवादी विचारसरणी या पहिल्या प्रकरणात मार्क्सवादी साहित्याचे स्वरूप त्यांनी विषद केले आहे. सोबतच सुर्वेच्या साहित्यावर मार्क्सवादाचा प्रभाव कसा पडला, यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. पुढील प्रकरणात मार्क्सवादी साहित्य आणि सुर्वे यांचे साहित्य यामधील साम्य भेदही मोठ्या खुबीने त्यांनी स्पष्ट केले आहेत. पृष्ठ क्रमांक-१४ वर साम्यवादी विचारसरणीचा तत्त्ववेत्ता कार्ल मार्क्स याचा नारायण सुर्वेच्या कवितेवर कसा आणि किती प्रभाव होता याचे सुंदर विवेचन त्यांनी केलेले आहे. त्यादृष्टीने पुढील काव्य ओळी महत्त्वाच्या आहेत.

'माझ्या पहिल्या संपातच मार्क्स
मला असा भेटला
मिरवणुकीच्या मध्यभागी
माझ्या खांद्यावर त्याचा बॅनर होता
जानकी अक्का म्हणाली,
'वळीखलस'ह्याला ह्यो आमचा मार्क्सबाबा'

प्रस्तुत काव्यपंक्तीचे विवेचन करताना डॉ. तायडे सर असे म्हणतात की, सुर्वे यांच्या कवितेतून त्यांच्या कवी मनाच्या वृत्ती म्हणून ज्या जाणवतात त्यांचा मार्क्सवादी विचारसरणीची प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सबंध आहे. हे त्यांनी जाणीवपूर्वक

सिध्द केले आहे. दुसऱ्या प्रकरणात दलित साहित्यात नारायण सुर्वेचे स्थान काय? याविषयीचे विवेचन आलेले आहे. त्याचबरोबर सुर्वेच्या काव्याचे वेगळेपण कुठले याविषयीची सुंदर भाष्य त्यांनी याप्रकरणात केलेले आहे ते अभ्यासनीय आहे. भाष्य असे की, सुर्वेची दृष्टी दलितांपुरती मर्यादित नाही तर त्यापुढे जाऊन ते कामगाराचे दारिद्र्याचे सर्व सामान्यांचे क्षणचित्र रेखाटतात. जेथे दलित कविंना मर्यादा पडतात तिथे सुर्वे आपल्या कल्पनांना, भाव-भावनांना मर्यादा पाडत नाहीत हे त्यांचे निरीक्षण कवी सुर्वेना दलित जाणिवेपासून भिन्न करते. तिसऱ्या व चवथ्या प्रकरणात सुर्वेच्या काव्यातील स्फूर्ती, प्रेरणा आणि सुर्वेच्या काव्याचे कामगार जीवनाशी असलेले तादात्म्य याचे छान विवेचन ते करतात. त्याचबरोबर सुर्वेनी निर्मिलेल्या नव प्रतिमा यांचा नवा अर्थ ते लावतात. सोबतच कवितेचा आशय, वैशिष्ट्ये, समाज प्रबोधन आणि त्यांच्या कवितेचे वाङ्मयीन मूल्य काय? याविषयीचे सखोल विवेचन ते करतात. शेवटच्या पृष्ठात नारायण सुर्वेची त्यांनी प्रकट मुलाखत घेतलेली आहे. अपरिचित असलेले कवी नारायण सुर्वे डॉ. तायडे यांनी घेतलेल्या मुलाखतीतून नव्याने प्रकट होतात.

'बाबुराव बागूल यांची दीर्घकथा 'सूड' एक आकलन' हा २०१७ साली प्रकाशित झालेला डॉ. तायडे सरांचा तिसरा समीक्षाग्रंथ होय. सदरच्या ग्रंथाला नव्या पिढीतील समीक्षक डॉ. चिंतामण कांबळे यांची तीन पृष्ठांची प्रस्तावना लाभली आहे. खरे तर बाबुराव बागूल यांची 'सूड' ही कादंबरी जणू काही दीर्घकथाच आहे. परंतु बागूलांच्या इतर कथांच्या तुलनेत ही वेगळ्या धाटणीची जहाल कथा आहे. प्रस्तुत दीर्घकथेत दलित स्त्रीच्या स्वत्वाचा व आत्मभानाचा शोध आहे. सोबतच करुणा व चीड या भाव-भावनांचे प्रकटीकरणही आहे. डॉ. तायडे सरांनी या ग्रंथाची पाच प्रकरणात विभागणी केली आहे. पहिल्या तीन प्रकरणात 'सूड'च्या कथेवर काहीही लिहिलेले नाही. मात्र प्रकरण चौथे आणि पाचवे यामध्ये सूड कथेतील व्यक्तीदर्शने, 'सूड' कथेची वैशिष्ट्ये व भाषाशैली अशा अंगाने समीक्षा केली आहे. पृष्ठ क्रमांक ७६ वर त्यांनी केलेले भाष्य फार बोलके व अभ्यासनीय ठरते. येथेच 'सूड' या कथेचे खरे मर्म ते उलगडून दाखवतात. ते म्हणतात की, 'सूड' या दीर्घकथेतील जानकीचा हा जीवन संघर्ष आत्मशोधाचा, माणुसकीच्या प्रस्थापनेसाठी असतो. आज देश, देवळे, समाज,

संस्कृती ही सर्वश्रेष्ठ मानली जाते व माणसाला कमी लेखले जाते. म्हणून अशा ह्या संस्कृती, कल्पना, देव कल्पना, समाज कल्पना यांचा नाश व यांच्या नाशातून नव समाजाची रचना करावयाची आहे की, जिथे माणुसकी हे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे. अशा सर्व आदर्श मानवतावादी विश्वात्मक मूल्यांची जोपासना करणे हे या कथेमागील लेखकाचे स्वप्न आहे. त्यांचे हे भाष्य या समीक्षाग्रंथाला वेगळी उंची प्राप्त करून देते. पृष्ठ क्रमांक- ११९ वरील मराठी साहित्य विश्वातील साहित्यिकांचे अभिप्राय या ग्रंथाचे मोल आणि महत्त्व सिद्ध करतात.

'मेळघाटातील कोरकूंची लोक संस्कृती' २०१९ ला प्रकाशित झालेला डॉ. तायडे यांचा चवथा समीक्षाग्रंथ आहे. सदरच्या ग्रंथाला डॉ. शंकर राऊत यांची प्रस्तावना आहे. ७८ पृष्ठांच्या या ग्रंथात त्यांनी मेळघाटातील कोरकूंची जीवनशैली व संस्कृती, कलापरंपरा, लोकसाहित्य भाषा या अंगाने चिकित्सा केली आहे. सोबतच आदिवासी जमातीत कोरकूंचे स्थान काय, कोरकू जमातीची आर्थिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व वैद्यकीय व्यवस्था याविषयी सविस्तर व संशोधनात्मक पद्धतीने मांडणी केली आहे. पृष्ठ क्रमांक- ६८ वर नोंदविलेले निष्कर्ष या ग्रंथाची सिद्धता सिद्ध करतात. ते म्हणतात की, 'आदिवासी जमातीतील लोकांच्या सुधारणा होण्यासाठी विशिष्ट पद्धतीने त्यांच्याकडे शासनाने तसेच सामाजिक संघटनांनी सकारात्मक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. त्याचबरोबर त्यांना सर्व क्षेत्रांमध्ये सामावून घेणे गरजेचे आहे. त्यांचा विकास घडवून आणणे ही काळाची गरज आहे. तरच ते प्रगती करू शकतील व समाजाच्या प्रवाहामध्ये सहभागी होतील.' डॉ. तायडे यांनी नोंदविलेला हा निष्कर्ष कोरकूंच्या विकासासाठी मैलाचा दगड ठरू शकतो एवढे मोल व महत्त्व या ग्रंथाचे आहे. त्यामुळे हा ग्रंथ मराठी साहित्यातील एक ऐतिहासिक व सामाजिक दस्तऐवज ठरावा असे या ग्रंथाचे मोल आहे.

त्यांचे संपादीत ग्रंथ तीन वाङ्मयीन प्रवाह, (प्रा. रु. वा. पाटील गौरव ग्रंथ) तसेच ज्ञानदीप भाग १, मराठी पाठ्यपुस्तक हे बी.कॉम. भाग १ अभ्यासक्रमासाठी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात अभ्यासक्रमासाठी लागले होते व ज्ञानदीप भाग २ हे पुस्तक बी.कॉम. भाग २ करिता अभ्यासक्रमात लागले होते. ह्या दोन्ही पुस्तकांमध्ये महात्मा गांधी, संत गाडगे बाबा, डॉ.

बाबासाहेब आंबेडकर, डॉ. अब्दुल कलाम, डॉ. पंजाबराव देशमुख अशा मान्यवरांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय विद्यार्थ्यांना करून देणे हा त्यांचा या पुस्तकामागील संपादनाचा उद्देश होता. उपरोक्त इतर समीक्षा ग्रंथ हे सुद्धा मराठी वाङ्मयाच्या समीक्षा प्रांतात मोठी भर घालणारे आहेत यात शंका वाटत नाही.

एकूणच डॉ. विलास तायडे सर यांच्या जीवन कार्याचा आणि वाङ्मय संपदेचा सखोल चिंतन व अभ्यास केला तर अनेक विविध पैलूंचा उलगडा होत जातो. त्यांच्या एकंदरीत वाङ्मय आणि जीवन कार्याविषयी असे आपणाला ठामपणे म्हणता येते की, व्यक्ती म्हणूनच नव्हे तर एक जबाबदार पती व पिता त्याच बरोबर एक आदर्श प्राध्यापक, समीक्षक, दर्जेदार लेखक, समाजसेवक, उत्तम वक्ता, उत्कृष्ठ संशोधक तथा मार्गदर्शक त्याच प्रमाणे समाजाच्या प्रश्नाची जाण असणारा, समाजाचे नेतृत्व करणारा, अज्ञजनांचे प्रबोधन करणारा, आकोटचे भूषण ठरणारा अशा विविधांगी भूमिका वठविणारा हरहुन्नरी व्यक्तिमत्त्वाचा व्यक्ती म्हणजे डॉ. विलास तायडे सर होत. सर आज नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होत असले तरी ते सामाजिक क्षेत्रातील कार्यातून निवृत्त होणार नाहीत याचा मला विश्वास आणि खात्री आहे. पुढेही त्यांच्या हातून असेच कार्य अविरत घडत राहो हीच शुभेच्छा!

**संदर्भ ग्रंथः**


१. नामदेव ढसाळांची कविताः स्वरूप आणि आकलन डॉ. विलास तायडे, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव – २०१५

२. नारायण सुर्वेची कविता : स्वरूप आणि समीक्षाः डॉ. विलास तायडे, आकांक्षा टंकलेखन, हिवरखेड–२०१८

३. बाबुराव बागूलांची दीर्घकथा सूड एक आकलनः डॉ. विलास तायडे, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव – २०१७

४. मेळघाटातील कोरकूंची लोकसंस्कृतीः डॉ. विलास तायडे, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव २०१९

५. मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड सातवाः १९५० ते २००० भाग तिसरा, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे– २०१०


■ ■ ■